भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/११/२०१७

**१) संगनमत करून लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/११/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र.१ हा फिर्यादी नरेद्र सुकदेव रंगारी वय ४१ वर्ष रा. कळमना रोड बौध्द विहार कामठी याचे आईला शिवीगाळ करीत असतांना, फिर्यादीने तु माझ्या आईला शिवीगाळ करू नको, असे म्हटले असता यातील आरोपीतांनी संगनमत करून ४ चार चाकी गाडी मधुन लोखंडी रॉड आणुन फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी रॉड मारून जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने सरतर्फे फिर्यादी शहारे यांचे रिपोर्ट व फिर्यादीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२६,५०६,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) एसटी बसच्या धडकेत एक जखमी :–**

दिनांक २६/११/२०१७ चे ११.१५ वाजता दरम्यान यातील जखमी गंगाधर सदाशिव नेवारे वय ३० वर्ष रा. आमगाव आर्दश हा त्याचे दुचाकी क्र. एमएच ३६ टी ४२७३ नी जात असतांना नागपुर वरून गडचिरोली ला जाणाऱ्या एसटी बसच्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारून, गंगाधर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुधाकर गुलाबराव वाघ वय ४८ वर्ष रा. आमगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटरे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैशाची चोरी . :–**

दिनांक २५/११/२०१७ चे २२.०० ते २६/११/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी उत्तम नारायण गायधने वय ४३ वर्ष रा. हरदोली हे बाहेर गावी नातेवाहीका कडे गेले असता, घरी मुलगा व फिर्यादीची आई हजर असतांना कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मागील दार उघडुन घरात प्रवेश करून बेडरूम मधील लोखंडी कपाटात ठेवलेला १ सोन्याचा डोरला चजन १.५ ग्रॅम, सोन्याचे मनी २ ग्रॅम, चांदीचे जोडवे २ तोडे, चांदीची चैन १ तोडा चांदीची अंगठी ५ ग्रॅम व नगदी १०००/रु असा एकुन ८,३५०/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) पर्श मधील पैसे व मोबाईलची चोरी . :–**

दिनांक २५/११/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कु. तृप्ती चिंधु सिरपुरकर वय १९ वर्ष रा. मोहाडी जि. नागपुर ही गावी जाण्या करीता बस मध्ये चढत असतांना कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचा पर्स चोरून नेल्याने पर्स मध्ये असलेला १ झोला इरा १ एक्स कंपनीचा मोबाईल कि. ५,०००/रु, पर्स कि. १७०/रु व पर्स मधील बिटी कॉर्ड, कॉलेज ची पावती असा एकुण ५१७०/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मोबाईलची चोरी . :—**

दिनांक २५/११/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अमर रामभाऊ खेताडे वय २३ वर्ष रा. राममंदीर वार्ड भंडारा याचा १ ओपो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट कि. १३,०००/रु. चा घरी फ्रिजवर ठेवला असतांना खुल्या घरातुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने, फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/११/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन मोहगाव फाटा येथे आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. बावणकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बावणकर पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक २६/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,करडी, तुमसर,सिहोरा,गोबरवाही, व साकोली येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ लिटर हातभट्टी दारू + ५०० किलो सडवा मोहा किंमती २८,९५०/—रू. व ०२ लिटर ३४० मिली लिटर देशी दारु किंमती १०४१/—रु. असा एकुण किंमती २९,९९१/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २६/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०४ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व ईतर वाहनांवरती १४३ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.